# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- शासनाच्या मुलभूत सोयी सुविधा निधी - सन २०१८/१९ अंतर्गत शिल्लक रक्कमेतून ओसवालवाडी, कामतघर परिसरात सी.सी. रस्ते तयार करणे.

मे.सादर,

श्री मनोज मोतीराम काटेकर सो., माजी नगरसेवक – प्रभाग क्र. २१ (ड) यांचे विषयांकीत कामी पत्र प्राप्त झाले आहे. त्यांनी शासनाच्या मुलभूत सोयी सुविधा निधी - सन २०१८/१९ अंतर्गत शिल्लक रक्कमेतून ओसवालवाडी, कामतघर परिसरात सी.सी. रस्ते तयार करणे बाबत मागणी केलेली आहे.

प्र.स.क्र. ०३ अंतर्गत शासनाच्या मुलभूत सोयी सुविधा निधी (सन २०१८/१९) अंतर्गत प्रभाग क्र. ४५ कामतघर सर्व्हे नं. १५८ पै, सर्व्हे नं. ७१,७२ व ७३ या परिसरातील मंजुर विकास आराखड्यानुसार रस्ते विकसित करणे कामी एकुण २,८२,०४,६८१/- इतके अनुदान मंजुर झाले होते. त्याअनुषंगाने ई निविदा प्रक्रियेव्दारे निविदा मागविण्यात असुन निम्नतम दराचे निविदाकार मे. कमल एन्टरप्रायजेस, दहिसर, मुंबई. यांना इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./७५७, दि. १५/०२/२०१९ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यांत आलेले होते. सदर संस्थेने नमुद काम काही प्रमाणात पुर्ण करुन उर्वरित काम प्रलंबीत ठेवलेले होते. सदर संस्थेने केलेल्या कामाचे देयक रक्कम रु. ६७,१०,९०५/- इतके अदा करण्यांत आले आहे. काम पुर्ण करणेकामी संबंधीत संस्थेस वारंवार कळवून देखील उर्वरीत कामास संस्थेने सुरुवात केली नाही. सबब संस्थेस इकडील जा.क्र./भिनिशमनपा/बांध./१०५६, दि. ०८/०३/२०२२ नुसार कारणे दाखवा नोटीस देखील बजाण्यांत आलेली आहे. परंतु सदर नोटीशीस संस्थेने कोणत्याही प्रकारे अद्याप पर्यंत प्रतिसाद दिलेला नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक – ११९८/प्र.क्र.३०/ नवि-०४ दि. २८ मार्च २०२२ नुसार सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये वितरित केलेल्या निधीच्या अनुषंगाने कामे पुर्ण करुन निधी खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

सबब प्रभाग क्र. ४५ कामतघर सर्व्हे नं. १५८ पै, सर्व्हे नं. ७१,७२ व ७३ या परिसरातील मंजुर विकास आराखड्यानुसार रस्ते विकसित करणेचे काम आहे त्या स्थितीत अंतिम करुन, सदर कामातील उर्वरित निधी रक्कम रु. २,१४,९३,७७६/- विषयांकीत कामास वापरल्यास शासन निधीचा योग्य प्रकारे विनियोग होऊ शकतो. तरी सदर कामाचे रक्कम रु. २,११,७१,८५३/- इतकेचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेकरिता मा. जिल्हाधिकारी सो., ठाणे. यांचेकडे पाठविणेकामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे त्यास दिनांक /१०/२०२२ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे.

ठराव क्रं. : ३९ दिनांक :-०८/१०/२०२२

**शासनाच्या मुलभूत सोयी सुविधा निधी - सन २०१८/१९ अंतर्गत शिल्लक रक्कमेतून ओसवालवाडी, कामतघर परिसरात सी.सी. रस्ते तयार करणे** कामी रक्कम रु. २,११,७१,८५३/- इतकेचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेकरिता मा. जिल्हाधिकारी सो., ठाणे. यांचेकडे पाठविणेकामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका